**Anekant Journal of Humanities and Social Sciences**
A Half Yearly and Peer Reviewed Open Access Print and Online Journal
http://www.humanitics.org/

**RESEARCH ARTICLE** **Vol.III, Issue I, August, 2020**

# महाराष्ट्रातील संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगार चळवळीचा चिकित्सक आढावा

प्रा. राजू देवराम पांडे
राज्यशास्त्र विभाग
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती
फोन नं: ९४०३५९८४१६
**Email Id- rajpande17@gmail.com**

## प्रस्तावना

भारतामध्ये स्वतंत्रपुर्व काळात विडी उद्योगाला सरुवात झाली. विडी उद्योगातील कामगार हा असंघटित क्षेत्रातील आहे. ग्रामीण व शहरी भागा मध्ये विडी उद्योगाचा विस्तारा मोठ्य प्रमाणत झाला आहे. या कामगारांचे अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटनाचा उदय झाला. या कामगार संघटनानी कामगारांना संघटित करुन कामगारांच्या न्याय हक्कांसाठी संघर्ष केला. विडी कामगार चळवळीने विडी कामगारासाठी अनेक कायदे करण्यास सरकारला भाग पाडले. विडी कामगार चळवळ ही एक जागृत आणि संघर्षशील परंपरा असलेली चळवळ आहे. भारताच्या कामगार चळवळीमध्ये विडी कामगार चळवळीचे वेगळे स्थान आहे. या विडी कामगार चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या नेतृत्वांनी देशातील आणि महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. भारतीय स्वतंत्र्याची चळवळ, संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीची चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, आणीबाणी विरोद्यी चळवळ, शेतकरी चळवळ, उदारीकरणास विरोधी अशा अनेक चळवळीमध्ये विडी कामगारांचे महत्त्वाचे योगदान आहे. भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेमध्ये विधायक स्वरुपाच्या हस्तक्षेपाची भूमिका ही विडी कामगार चळवळीने पार पाडली आहे. अशा संघर्षशीलतेची पार्श्वभूमी असलेल्या विडी कामगार चळवळीला अनेक प्रश्नांनासामोरे जावे लागत आहे. भारताने स्वीकारलेल्या उदारीकरणाच्या धोरणाची किनार आहे. विडी कामगार चळवळी समोरील उपस्थित प्रश्नांची चर्चा करण्याच्या हेतुने प्रतिनिधीक स्वरुपात संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यातील विडी कामगाराच्या चळवळीच्या अनुषंगाने एक चिकित्सक आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आला आहे.

## विडी व्यवसायाची पार्श्वभुमी:—

देशामधील आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ, पश्चिम बंगाल, बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र इत्यादी राज्यामध्ये विडी व्यवसाय चालतो. विडी उद्योगामध्ये ६० लाख विडी कामगार आणि ४० लाख तेंदुपान गोळा

करणारे कामगार आहेत. यापैंकी ९० टक्के स्त्रिया आणि लहान मुले काम करतात. (के. श्रीनिवासूलु, १९९७, पृ. ५१५) महाराष्ट्रातील भंडारा, गोंदिया, सोलापूर, मुंबई, जालना, नांदेड, नाशिक, अहमदनगर, संगमनेर, अकोले, सिन्नर इत्यादी भागामध्ये विडी उद्योग चालतो. सध्या महाराष्ट्रात ४ लाख विडी कामगार काम करतात.

**संगमनेर, अकोले तालुक्यातील भौगोलिक स्थिती :—**

अहमदनगर जिल्ह्यतील संगमनेर, अकोले तालुक्यातील उत्तरेकडील भाग हा अवर्षणग्रस्त पट्ट्यात येतो. त्यामुळे येथे नेहमीच दुष्काळाची परिस्थिती निर्माण होत होती. येथील शेती जिरायती असल्यामुळे मुख्यत पावसाच्या पाण्यावर अंवलबून होती. पावसाचे प्रमाण कमी, नेहमीची दुष्काळी स्थिती होती. अशा भौगोलिक परिस्थितीमुळे शेतीला पूरक म्हणून विडी उद्योगाची सुरुवात झाली. शेतीला पर्यायी उपजीविकेचे साधन म्हणून लोक या व्यवसायाकडे आकर्षित झाले. अल्प भांडवलात जास्त नफा आणि दुष्काळी परिस्थितीमुळे अल्पमजुरीत मोठ्य प्रमाणात मिळणारा कामगार वर्ग उपलब्ध होता. याकडे विडी मालकांचे लक्ष गेले. त्यांनी या भागात विडी व्यवसाय सुरु केला. ग्रामीण भागात शेतीला पर्यायी उपजीविकेचे प्रमुख साधन म्हणून विडी व्यवसाय हळूहळू विस्तारत गेला. त्यामधून विडी कामगारांची संख्या वाढत गेली. स्वातंत्र्यपुर्व काळात महाराष्ट्राच्या अवर्षणग्रस्त भागात विडी व्यवसायाला अनुकुल अशी परिस्थिती निर्माण झाली. म्हणुन या भागात विडी व्यवसायाची सुरुवात झाली.

**विडी कामगारांचे प्रश्नः—**

अतिशय कमी मजुरी, वेळेचे कोणतेही बंधन नाही, मालकांच्या लहरीवर आधारीत, कामाचे नियम नाहीत, कामाची शाश्वती आणि कायद्यचा आधार नाही, असंघटित कामगार इत्यादीमुळे केवळ पोट भरण्याचे साधन म्हणून काम करावे लागत होते. त्याचे स्वरुप अतिशय विस्कळीत आणि अल्प असे होते. विडी उद्योगातील कामगारांना अनेक समस्याचा समना करावा लागत होता. या विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगारांची संघटना आवश्यक होते. विडी कामगार नेतृत्वांनी विडी कामगारांचे संघटन करुन विविध कायदे आणि कल्याणकारी योजना करण्यास राज्यसंस्थेस भाग पाडले. परंतु विडी कामगारांना मिळाले कायदेशीर हक्क आणि कल्याणकारी योजनांकडे सरकार आणि विडी व्यावसायिकाकडून दुर्लक्ष केले जाता आहे. त्यामुळे विडी कामगारांना आपले हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

**विडी कामगाराचे संघटनः—**

१९१० मध्ये संगमनेर, अकोले आणि शेजारील सिन्नर तालुक्यामध्ये विडी उद्योगाची सुरुवात झाली. या भागात शेतीपासून मिळणारे उत्पादन सोडून दुसरा कोणताही व्यवसाय नव्हता. ग्रामीण भागात शेतीला पर्यायी व्यायसाय म्हणून विडी बांधण्याच्या कामाकडे शेतकरी आकर्षित झाला. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागात विडी व्यवसायाचा विकास होत गेला. कामगारांची संख्या वाढत गेली. प्राथमिक अवस्थेत स्वातंत्र्यपुर्व काळात विडी उद्योगाचा मोठ्य प्रमाणत विस्तारा झाला. या कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी कामगार संघटना उदयास आल्या.

१९३० च्या दशकात विडी कामगाराच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विडी कामगारांना संघटित करण्यास सुरुवात झाली. त्याला स्वतंत्र चळवळीचा संदर्भ होता. स्वातंत्र्य चळवळीला जोडून घेण्यासाठी स्वतंत्र चळवळीच्या नेतृत्वाने विडी कामगारांना सहभागी करुन घेतले. देशात गांधी युगाला प्रारंभ झाला होता. ग्रामीण महाराष्ट्रातील तरुण वर्गाचे स्वतंत्र चळवळी मध्ये सहभागी होण्याचे प्रमाण वाढले होते. १९३२ मध्ये भारतीय

स्वतंत्र चळवळीचा एक भाग म्हणजे जंगल सत्याग्रह होय. या जंगल सत्याग्रहात या भागातील स्वतंत्र चळवळीमध्ये विडी कामगार मोठया प्रमाणात सहभागी झाला होता. १९३९—४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ जेधेबाई, श्री. बुवासाहेब नवले, श्री. नानासाहेब पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली झाली. श्री. नानासाहेब पिंगळे, श्री. रामभाऊ नागरे यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विडी कामगाराची संघटना स्थापन केली. १९४५ मध्ये समाजवादी पक्षाचे भास्करराव दुर्वे यांनी विडी मजदूर सभेची स्थापना केली. श्री. बी. जे. खताळ पाटील आणि हरिभाऊ वर्पे यांनी इंटक विडी कामगार संघटना सुरु केली. १९७४ मध्ये कॉ. दत्ता देशमुख यांनी संगमनेर, अकोले, सिन्नर तालुका विडी कामगार संघटना स्थापन केली. विडी कामगार नेतृत्वाने कामगारांमध्ये जाणीव पुर्वक संघटित करण्यास सुरुवात केली होती. कारण या भागात विडी कामगारांची संख्या ही जास्त होती. त्यामुळे विडी कामगार वर्गाला राजकीय दृष्टया संघटित करुन राजकीय, सामाजिक चळवळीशी जोडण्याचे काम करण्यात आले होते.

**विडी कामगारांचा राजकीय क्षेत्रातील हस्तक्षेपाची भुमिका :—**

कॉ. दत्ता देशमुख हे १९४६ मध्ये काँग्रेसचे आमदार होते. १९४६ ते १९६२ पर्यत महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये संगमनेरचे प्रतिनिधीत्व करत होते. १९६२ मध्ये समाजवादी पक्षाचे भास्करराव दुर्वे यांनी निवडणूक लढविली होती. या निवडणूकीत कॉ. दत्ता देशमुख यांचा पराभव झाला. परंतु विडी कामगारांमध्ये संघटनात्मक काम असलेल्या समाजवादी आणि कम्युनिस्ट पक्षांनी स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभेच्या निवडणूका लढविल्या. १९९० नंतर विडी कामगारांकडून निवडणूका लढविण्याचे प्रमाण मात्र कमी झालेले दिसून येते. कारण पूर्वी प्रत्येक गावामध्ये विडी कामगार कार्यकर्त्यांचा संच होता. परंतु १९८० च्या दशकात शेतीला पाणी आल्यामुळे विडी कामगार कमी झाला. लाल निशाण पक्षांने निवडणूक लढविणे बंद केल्यामुळे त्यांचे कार्यकर्ते इतर पक्षात गेले. तर बागायती शेतीमुळे शेतकरी तालुक्यातील सहकारांच्या राजकारणांशी एकरूप झाला. विडी कामगारांमध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त असले. तरी प्रत्येक कुटुंबात वेगवेगळ्या पक्षाचे कार्यकर्ते निर्माण झाले. १९९० नंतर विडी कामगार कार्यकर्त्यांनी निवडणूका लढवून सुध्दा त्यांना अपयश आलेले दिसून येते. विडी कामगारांमध्ये काम करणारे नेतृत्व हे निवडणुकीच्या माध्यमातुन संसदीय राजकारण करत होते. राजकीय स्वरुपाचा विधायक हस्तक्षेप करत होते. परंतु विडी कामगारांचा राजकीय हस्तक्षेपाच्या माध्यमातुन सुरु असलेले दबावाचे राजकारण पुर्णपणे थांबलेले दिसून येते.

**विडी कामगारांचा सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान:—**

तसेच शिक्षणाचे महत्त्व ओळखुन विडी कामगारांच्या नेतृत्वांने आणि विडी मालकांनी संगमनेर कॉलेजच्या उभारणी मध्ये विडी कामगारांना सहभागी करुन घेतले. विडी कामगारांनी संगमनेर कॉलेजला मदत म्हणुन आपली दोन दिवसाची मजुरी दिली. विडी कामगार नेतृत्वांने विडी कामगार वर्गाचे संघटन फक्त विडी कामगाराचे प्रश्न आणि आर्थिक फायदा मिळविण्यासाठी केले नाही. तर आपल्या न्याय हक्कांसाठी संघटित करुन आर्थिक मागण्या पुरते सिमित न ठेवता. हा विडी कामगार भारतीय स्वतंत्र्याची चळवळ, सावकारशाही विरोधी कर्ज रोखे फाडण्याची चळवळ. सक्तीची (धान्याची) लेव्ही वसुलीची चळवळ, संयुक्त महाराष्ट्र राज्य निर्मितीची चळवळ, गोवामुक्ती संग्राम, आणीबाणी विरोधी चळवळ, शेतकरी चळवळ, उदारीकरणा विरोधी चळवळ इत्यादी चळवळीमध्ये सहभागी झालेला आहे. विडी कामगार चळवळी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान हे महत्त्वाचे आहे.

**विडी कामगार चळवळीची सद्यस्थिती:—**

परंतु सद्या संगमनेर, अकोले, सिन्नर, अहमदनगर या भागात विडी कामगार चळवळी मधून नवीन नेतृत्व निर्माण होताना दिसून येत नाही. त्याला विविध करणे आहेत. उदारीकरणामुळे निर्माण झालेल्या रोजगारांच्या विविध संधी, जागतिक आरोगय संघटनेच्या धोरणांना पुरक केंद्र सरकारने तंबाखुजन्य पदार्था विषयी घेतलेले निर्णय, विडी उद्योगाचे बदललेले स्वरुप, शिक्षणाचे वाढलेले प्रमाण, शेतीला पुरक नवीन सुरु झालेले पर्यायी उद्योग, त्यामुळे नवीन कामगार विडी व्यवसायात येत नाही. विडी कामगार चळवळीला संघर्षाची समृध्द अशी परंपरा आहे. अशी संघर्षशील परंपरा असलेल्या विडी कामगार उद्योग संपुष्टात येतो की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच या भागात कॉ. गुलाबराव देशमुख यांच्या निधनानंतर विडी कामगारांमध्ये वैचारिक बैठका असलेले आणि व्युहारचानात्मक विडी कामगारांची चळवळ पुढे घेऊन जाणाऱ्या नेतृत्वाची पोकळी दिसून येते. विडी उद्योग आणि विडी कामगारासमोर सर्वात मोठा पेच प्रसंग आहे.

**विडी कामगारांचे संघटन आणि विविध प्रश्नांवरील वर्ग लढे:—**

१९४० मध्ये संगमनेर, अकोले तालुक्यातील विडी कामगारांची संख्या तीन हजारांपर्यत गेली होती. विडी व्यवसायाच्या प्रश्नांचे स्वरुप बदलले होते. विडी व्यवसायामध्ये एकत्र बसून काम करण्याच्या पध्दतीमुळे सततपणे वेगवेगळ्या विषयांवर चर्चा चालत असे, विडी कामगारामध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली होती. विडी कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी विडी कमगारांची संघटना असावी. असे विडी कामगारांना वाटत होते. या विडी कामगारांना संघटित करुन राजकीयदृष्टया जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न श्री. नानासाहेब पिंगळे, श्री. रामभाऊ नागरे, कॉ. दत्ता देशमुख, साथी भास्करराव दुर्वे, कॉ. परब, अमृतभाई मेहता, कॉ. सहाणे मास्तर, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. परब, कॉ. राम रत्नाकर, हरिभाऊ वर्पे, दादाभाऊ हासे, ॲड. त्रिंबक सोनवणे, कॉ. गुलाबराव देशमुख, साथी सायन्ना एनगंदूल, रंगनाथ वाकचौरे, निवृत्ती आंबेकर, कॉ. करभारी उगले, सुखदेव वर्पे, कॉ. निवृत्ती दातीर, कॉ. शंकर न्यालपल्ली, कॉ. निवृत्ती आंबेकर, कॉ. शांताराम वाळुंज, कॉ. बापुसाहेब कानवडे, शिवराम कडलग इत्यादी कार्यकर्ते विडी कामगार चळवळी मधून पुढे आले.विडी कामगार नेतृत्वांनी विडी कामगारांमधुन कार्येकर्तांचा संच तयार केला. परंतु महाराष्ट्र मध्ये विडी कामगार चळवळी मधून नवीन नेतृत्व आज पुढे येताना दिसून येत नाही.

विडी कामगार नेतृत्वांनी विडी कामगारांच्या हक्कांसाठी विडी कामगारांमध्य वर्ग जाणीव घडविण्याचे काम केले. विडी कामगारांनी किमान वेतन कायदा १९४८, विडी सिगार कायदा १९६६, विडी कामगार कर व विडी कामगार कल्याणनिधी कायदा १९७७—७८, भविष्य निर्वाह निधी, बोनस व ग्रॅच्युइटी, प्रॉव्हिडंट फंड, विमा, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, बाळंतपणाची रजा, पानपुडा, विडी बंडल घेण्यास विरोध, कामगार कप्पातील विरोध असा सतत संघर्ष करुन कामगारांचे हक्क मिळविले. त्याच बरोबर विडी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, चष्मा घेण्यासाठी अनुदान, जनश्री विमा योजना, कुटूंब नियोजन करण्यासाठी प्रोत्साहनपर आर्थिक मदत, मोफत दवाखाण्याची सुविधा, महिलांना प्रसुती लाभ योजना, घरकुल योजना इत्यादी कल्याणकारी योजना विडी कामगारांसाठी लागू करण्यास विडी कामगार चळवळ यशस्वी झाली. परंतु विडी कामगारांसाठीचे कायदे आणि कल्याणकारी योजनाच्या संरक्षणासाठी विडी कामगारांना संघर्ष करावा लागत आहे. १९९० च्या पुर्वीपासून विडी उद्योगामध्ये टप्पा — टप्यांने बदल घडूण येण्यास सुरुवात झाली. विडी उद्योगामध्ये घरखेप, सहकारी सोसायटी, कंत्राटी पध्दत सुरु करण्यात आली. विडी कामगारांचे कायदेशीर हक्क डावलण्यासाठी आणि कल्याणकारी योजनकडे दुर्लक्ष करण्यासाठी हे बदल झालेले दिसून येतात. विडी कामगार हा असंघटित कामगार आहे. असंघटित कामगारांना आपल्या मागण्या मान्यकरुन घ्याव्या लागतात. त्यांच्या

अंमलबजावणीसाठी संर्घष करावा लागतो. त्यासाठी असंघटित कामगारांना संर्घषात्मक आणि व्यहुरचनात्मक डावपेच आखावे लागतात. त्याच बरोबर न्यायलयीन लढे लढावावा लागतात. सध्या विडी कामगार चळवळीला विडी व्यवसाय सुरु राहिला पहिजे. तसेच विडी कामगारांचे हक्क सुरक्षित राहिले पहिजे. अशा दुहेरी स्वरुपाच्या प्रेच प्रसंगाला सामोरे जावा लागत आहे.

**विडी कामगार संघटनेचे रचनात्मक आणि विधायक कार्येः—**

संगमनेर, अहमदनगर, सोलापूर येथे विडी कामगारासाठी घरकुल योजना आतिशय चांगल्या प्रकारे राबविल्या आहेत. महाराष्ट्रांमध्ये विडी कामगारांसाठी घरकुल योजनेची सुरूवात संगमनेर येथे झाली. ''घुलेवाडीच्या महिला विडी कामगारांसाठी संगमनेर महाविद्यालयाच्या पुढाकाराने राबविलेल्या इंद्रायणी गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन नानासाहेब गोरे यांच्या हस्ते झाले. नानासाहेबांनी 'जनता' च्या अंकात या प्रकल्पावर लिहून या कामाचे कौतुक केले. प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्या वसाहतीचे उद्‌घाटन कॉ. गोदूताई परूळेकर यांनी केले. ''या प्रकल्पातून प्रेरणा घ्या'' असा सल्ला नंतर त्यांनी आपले सहकारी नरस्या आडम यांना दिला आणि सोलापूर मध्ये आडम मास्तरांनी विडी कामगारांच्या गृहनिर्माण संस्था राबविल्या.'' (लामखडे. म. रा. साधना, २०१३, पृ.१८.) '' नगर शहरामध्ये कॉ. राम रत्नाकर, कॉ. शंकर न्यालपेल्ली यांनी १९८५ मध्ये 'लाल बावटा' युनियने ४०० घराचा प्रकल्प राबविला. तर इंटक प्रणित विडी कामगार संघटनेनी १२० घरे बांधली. (मुलाखत, शंकर न्यालपल्ली, ४ जून, २०१३.) संगमनेर, अकोला, सिन्नर तालुका विडी कामगार समितीचे अध्यक्ष कॉ. गुलाबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर मध्ये 'लाल निशाण पक्ष' प्रणित कॉ. दत्ता देशमुख नगर श्रमिक विडी कामगार सहकारी गृह निर्माण संस्था ही महिला विडी कामगारांची १२० घराची वसाहत निर्माण केली आहे.

उदारीकरण्यामुळे नवीन रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या. ग्रामीण भागात विडी व्यवसायाला पुरक शेती, दुग्ध, फळबाग व्यवसाय निर्माण झाले. तर शहरी भागात अनेक रोजगारांच्या संधी उदारीकरणानंतर निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे नव्याने कामगार विडी व्यवसायात येण्याच प्रमाण खूप कमी झाले आहे. त्यामध्ये विडी व्यवसाय पेक्षा इतर व्यवसाया मध्ये पैसा जास्त मिळतो. विडी उद्योगाला सिगारेट, गुटखा यासारख्या तंबाखुजन्य उत्पादनांशी स्पर्धा करावी लागत आहे. अशी दुहेरी कात्रीत आडकलेल्या विडी उद्योगाकडे सरकार आणि विडी व्यावसायिक यांनी दुर्लक्ष केलेले दिसून येते

**समारोपः—**

स्वांतत्र्यपूर्व काळात निर्माण झालेला विडी व्यवसाय संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यात विकसित झाला. विडी कामगारांच्या चळवळीचे केंद्र बनले. या विडी कामगार चळवळीच्या नेतृत्वांने एक काळ राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर विडी कामगारांचे नेतृत्व केले. तसेच राजकीय, सामाजिक चळवळीचे नेतृत्व केले. निवडणूकांच्या माध्यमातून संसदीय राजकारण करुन विडी कामगार शेतकरी वर्गाचा एक दबाव गट निर्माण करून आपल्या मागण्या राज्यसंस्थेला मान्य करण्यास भाग पाडले. असा वारसा असलेली विडी कामगार चळवळ सध्या तरी प्रभावहीन झालेली दिसून येते. विडी व्यवसायाला संरक्षण मिळविण्यासाठी आणि विडी कामगारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी विडी कामगार चळवळीला संघर्ष करावा लागताना दिसून येतो.

## मराठीसंदर्भः—

१. आंबेकर निवृत्ती, १९८८, 'विडी उद्योग व कामगार चळवळ', विडी कामगार अधिवेशन विशेषांक, सोलापूर, पृ.२४.

२. रत्नाकर राम, १९८८, 'विडी कामगार कल्याण निधी व कामगारांसाठी सुविधा', विडी कामगार अधिवेशन विशेषांक, सोलापूर, पृ. १७,२०.

३. रेड्डी, जी. एल, १९८०, 'विडी कामगारांची व्यथा आणि कथा', पुस्तिका, प्रकाशन मुंबई, विडी कामगार युनियन, मुंबई– ०८.

४. वकील अलीम, कसबे रावसाहेब, धर्म दिलीप, १९८०, चुनीकर. एस. आर, 'दर्शन', 'संगमनेर तालुक्याचे राजकारण काल, आज, उद्या', दर्शन, संगमनेर शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, पृ.९,१०,११.

५. लामखडे. मा. रा.२०१३, 'प्रयोगशील परिवर्तनवादी प्राचार्य','साधना', पुणे– ३०, पृ. १८.

६. सोनवणे. टी. जी. १९८०, 'विडी कामगार व त्यांचे भवितव्य', चुनीकर. एस. आर, 'दर्शन', संगमनेर शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, पृ. ३०.

७. सोनवणे. टी. जी. १९८८,'महाराष्ट्र राज्य विडी कामगार फेडरेशन', विडी कामगार आधिवेशन विशेषांक, सोलापूर, ४व ५ जून, पृ.२,३.

८. लोके गणपत, १९९३, नवे पर्व, 'दत्ता देशमुख शतायु होवोत, कॉ.दत्ता देशमुख कष्टकरी महाराष्ट्राचे एक शिल्पकार', १ सप्टेंबर, पृ. २, १९.

९. देशमुख गुलाबराव, उगले कारभारी, एनगंडूल सायन्ना, १९९७, 'विडी मालक व सरकार यांच्या अभद्र युतीविरुद्ध संघर्ष', महाराष्ट्र टाईम्स, ४ नोव्हेंबर, १९९७.

१०.पांडे राजू देवराम, 'महाराष्ट्रातील कामगार संघटनांचे राजकारण आणि कॉ. दत्ता देशमुख यांचे नेतृत्व' एम. फिल (राज्यशास्त्र विभाग) येथे पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित लघु शोध प्रबंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, जानेवार, २०१७.

## English Reference:

1. Chavan Ashok, 2001, *'History and Struggles of Beedi Workers in India'* New Delhi: All India Trad Union Congress.

2. Thakur Satya Narayan, 2006, 9th National Conference, *All India Beddi Cigar & Tobacco Workers Federation Siddipet* (A.P) 24, 25, &26 September, 2006.

3. K Srinivasulu, 1997, Andhra Pradesh Impact of Liberalisation on Beedi Workers, *Economic and political Weekly*, March 15, 1997, p 515- 517

4. M Mohandas, 1980, Beedi Workers in Kerala: Conditions of Life and *Worke, Economic and political Weekly,* 1 September, 1980

5. Correspondent, Maharashtra Beedi Workersof Sinnar, *Economic and Political Weekly,* 1974, Vol – 9, Issue No 24, 01 April 2000, June 15, p